Impact Factor (SJIF): 6.092 E-ISSN: 2583-1615

International Journal of Research in Academic World

**Received**: 25/June/2023 **IJRAW:** 2023; 2(7):216-219 **Accepted:** 30/July/2023

# आधुनिक मराठी कवितेतील सौंदर्यवादी भावकवींच्या शैलीचे वेगळेपण

**[*1]Dr. Mamta Raut**

[*1]Assistant Professor, Department of Marathi, J.M.Patel Arts Commerce and Science College Bhandara, RTMNU Nagapur University, Nagpur, Maharashtra, India.

**सारांश**

आधुनिक मराठी कविता अनेक दृष्टीने समृद्ध झालेली आहे सामाजिक, प्रेम, नैसर्गिक व राष्ट्रीय कवितांच्या प्रवाहाप्रमाणे सौंदर्यवादी भाव कवींच्या प्रभावाने मराठी कवितेचे दालन अधिक समृद्ध व लयबद्ध केलेले आहे

मी ष्आधुनिक मराठी कवितेतील सौंदर्यवादी भाव कवींच्या शैलींचे वेगळेपणष या टॉपिक द्वारे 80 च्या दशकातील जे मुख्य सौंदर्यवादी भावकवी आहेत त्यांच्या सौंदर्यवादी वृत्तीच्याभाव कवितांचे वेगळेपण आणि त्यांची विशिष्ट शैली यांच्या सौंदर्यवादी दृष्टीने अभ्यास करून त्यांचे वेगळेपण शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे सौंदर्यवादी भावकवीच्या वाट्याला आलेल्या जाणिवाए त्यांची संवेदनशीलता किंवा बाह्यवास्तवाकडून प्राप्त होणाऱ्या संवेदना व्यक्त करताना त्यांची विशिष्ट शैली असतेए त्या शैलीचे वेगळेपण आणि त्यांचे भावजीवन कवितेतून कशाप्रकारे अविस्कृत होते त्यातील वेगळेपण शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे

आधुनिक मराठी कवितेत 80 च्या दशकातील ह्या सौंदर्यवादी भाव कवीने आपल्या शैलीच्या वेगळेपणाने मराठी कवितेला अधिकच समृद्ध केलेले आहे आणि याचा सखोल अभ्यास मी या शोध पत्रिकेद्वारे केलेला आहे

**मूल शब्दः** सौंदर्यवादी, शैली, जाणिवा, वेगळेपण, वास्तववादी

**प्रस्तावना**

साहित्यात लेखक किंवा कवी त्याच्या खास स्वतंत्र वृत्तीचा व त्यांच्या भाव संवेदनाच्या आधारे एका विशिष्ट रचनाबंधाचा स्वीकार करतो. त्याला 'शैली' असे म्हणता येते. अनेक साहित्यवृत्तीतून रचना पध्दतीत समानता आढळून येते. त्यालाही आपण शैली म्हणतो. प्रत्येक लेखक किंवा कवी हा त्यांच्या विशिष्ट शैलीमध्येच लेखन करीत असतो.

कवीच्या वाटयाला आलेल्या जाणिवा आणि त्याला भावलेली एखादी विशिष्ट नियोजीत शैली किंवा रचना पध्दती यांचा मेळ साधूनच त्यांच्या साहित्यकृतीची जडण–घडण होत असते. अशावेळी हया शैलीला तंत्राचे स्वरूप प्राप्त होते. शैलीची चिकिसा करतांना डॉ. सुंधीर रसाळ लिहीतात, ''लेखकाच्या जाणिवा शैलीला वाकविण्यात, यशस्वी झाल्यास निर्माण होणारी साहित्यकृती त्या शैलीचा विकास घडवून आणते. अशावेळी अनेकदा तिला काही नवी परिणाम, नव्या कक्षा प्राप्त होतात. यांनाच आपण प्रयोग असे म्हणतो. हे प्रयोग लेखकांच्या संवेदनशीलतेच्या, जाणिवांच्या संदर्भात अपरिहार्य असावे लागतात''[1]

एखादी कलाकृती घडवित असतांना कवी त्या कलाकृतीत जाणिवा, भाव, भावना यांच्या प्रकटीकरणात वेगळेपणा आणीत असतो किंवा जात्याच त्यांच्यात वेगळेपणा असतो, हा वेगळेपणा त्यांच्या शैलीची विशेषतः असते. हया विशेषतः मुळेच साहित्यकृतीचा आस्वाद घेतांना निर्माण होणाऱ्या किंवा घडणाऱ्या नव्या शैलीचे अस्तित्व जाणवल्या वाचून राहत नाही आणि कवी ''नवी शैली घडतांना निर्माण होणाऱ्या साहित्यकृतीत तिचे अस्तित्व हमखासपणे जाणवते.''[2] जे शैलीच्या विशिष्ट आहारी गेलेले असतात. अशा साहित्य कृतीत किंवा कलाकृतीत केवळ शैलीचेच अस्तित्व जाणवत असते. अशा कवितेला सुधीर रसाळ 'शैलीबाज काव्य म्हणतो' अशी साहित्यकृती आपले वेगळेपणा सिध्द करता सर्वाचे लक्ष वेधून घेत असते. त्याचबरोबर त्यात अर्थपूर्णतेचा व अपरिहार्यतेचा प्रत्यय येतो बऱ्याच अंशी अशा कलाकृती यशस्वी होत असतात.

पाश्चात्य शैलीविज्ञान वाङ्मयातील तत्वज्ञानानी शैली बद्दल काही महत्वाच्या व्याख्या केलेल्या आहेत. जे ''शैलीविज्ञान हे कलाकृतीच्या बाहयांगाचा विचार करत–करत तिच्या अंतरंगाचा वेध घेतो म्हणूनच शैलीविज्ञान हे खऱ्या अर्थाने साहित्याचे विज्ञान आहे''[3] असे अलोन्सो म्हणतात.

शैली म्हणजे आशयाचा वेध ही कल्पना इंग्रजी साहित्य विचारात आली. ड्रायनच्या मते शैली म्हणजे, ''विचाराचा शोध कवीच्या प्रतिमेची पहिली अवस्था. दुसऱ्या अवस्थेत या बीजरूप विचाराला प्रतिमा आकार देते. तिसऱ्या अवस्थेत शैलीच्या आधाराने या आकाराचे रूप प्रकट होते या विचारातून पुढे भाषा म्हणजे विचाराचे प्रावरण आणि शैली म्हणजे या प्रावरणांचा एक फॅशन हा विचार पुढे आला''[4]

व्यक्तीवर लक्ष केंद्रीत करणाऱ्या साहित्य मीमांसाकांनी यानंतर शैली ही लेखकाच्या प्रकृतीनेच ठरते असे मत मांडले. केनेवा रेक्सरेथ म्हणतो. ''शैली लेखकाचीच अभिव्यक्ती ठरते''[5] रिचर्डस हा शैलीवैज्ञानिक नव्हता पण त्याच्या नव्या चिकित्सक दृष्टिकोनातून

साहित्याकडे संशोधकाच्या वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहणे शक्य झाले.

रिचर्डसचे मते, ''शैलीवैज्ञानिक चिकित्सेला आवश्यक असणाऱ्या अनेक गोष्टीचा पायंडा त्याने पाडला. पारंपारीक समीक्षेचा आधार न घेणे, कवीच्या चरित्रात्मक संदर्भांना बाजूला ठेवणे आणि कविता आणि वाचक प्रतिक्रिया वरच लक्ष केंद्रीत करणे यात शैली चिकित्सेला आवश्यक असणारी वस्तुनिष्ठता आहे.''[6]

'शैली ही एक व्यक्तित्व विकासाची विकसनशील संकल्पना आहे. पाश्चात्य विचारवंत मरेने यांनी शैलीची अगदी साधी सोपी व्याख्या केली आहे. तो म्हणतो, ''स्टाईल इज ए क्वालीटी आूफ लॅंग्वेज बुईच कम्युनिकेटस प्रिसाईजली इमोशन्स ॲण्ड थॉटस पीक्युलिअर टू दि ऑथर'' म्हणजे लेखकाच्या विशिष्ट भावनांचे या विचारांचे निवेदन नेमकेपणाने करण्याचे भाषेचे वैशिष्टये म्हणजे शैली''.[7]

मूर्ती तयार करणाऱ्या कलाकारांच्या विशिष्ट कलागुणांना पाश्चात्य विचारवंत मरे नी शैलीचा विशेष गुण मानलेला आहे. यावरून लक्षात येते की, एकंदरीत कवीची सौंदर्य दृष्टी म्हणजेच 'शैली' होय. शैली संकल्पनेचा विचार करतांना निशिकांत ठकार यांनी 'स्टाईल इज दि मॅन' म्हणजे 'शैली' असे म्हटले आहे आणि निशिकांत ठकरांनी शैलीचे मुख्यत्वे तीन प्रकार सांगीतले आहे. ''शैली शब्दांचा साधारणपणे तीन अर्थानी प्रयोग करण्यात येतो.

1. प्रत्येक लेखकाच्या लेखनात काही विशिष्ट व्यतीगत लकवी असतात. त्यावरून तो लेखक लगेच ओळखू येतो. त्या लकबीनाच शैली असे म्हणतात.
2. शैली म्हणजे अभिव्यक्तीचे तंत्र म्हणजे साहित्याची सर्वोच्च उपलब्धी.
3. साहित्याची सर्वोच्च उपलब्धी म्हणजे शैली'. 'दि प्राब्लेम ऑफ स्टाईल' या ग्रंथात यासंबंधीचे सविस्तर वर्णन केले आहे''.[8]

''शैली'' मुळे कवीच्या मुक्त वृत्तीचा अविष्कार होत असतो. कवीला बाहय वास्तवातील आलेल्या अनुभवाबद्दल काही धडामोडीबद्दल प्रतिक्रिया देण्याची प्रत्येकाची वेगळी पध्दत असते. ही पध्दत म्हणजे त्यांची संवेदनशीलता किंवा बाहय वास्तवाकडून प्राप्त होणाऱ्या संवेदना स्वीकारण्याची त्याची पध्दत असे ही संवेदनशीलतेबद्दल म्हणता येईल. शैली विज्ञानाला सौंदर्यशास्त्राचा आधार असतो. हे सांगतांना श.ग. मालशे लिहीतात, ''सौदर्यशास्त्रीय अभिरूची केंद्रस्थानी कल्पनाविल्यास शैलीविज्ञान हे साहित्यिक व्यासंगाचा भाग ठरू शकेल. मात्र तो महत्वाचा भाग ठरेल. शैली वैज्ञानिक अभ्यास पध्दतीमुळेच साहित्यकृतीच्या प्रकृती धर्माचे वर्णन करणे शक्य होते.''[9]

मानवाची संवेदनशीलता संस्कृतीकडून त्याला मिळालेल्या जीवन–मूल्यांनी, त्यांच्या श्रध्दांनी नियमित झालेली असते. कवीच्या संवेदनशीलतेवर त्याचा कमी–जास्त प्रभाव पडत असतो. हया प्रभावातून साहित्यात शैलीचे व्यवस्थापन होत असते. प्रत्येक कवीची काव्यलेखनाची स्वतःची अशी भाषेसंबंधी खास वैशिष्टये असतात. निशिकांत ठकार लिहीतात, ''भावानुभवाला काव्यानुभवात रूपांतरीत करण्याचे साधन म्हणजे शैली''[10] त्यांच्या मते भावसौंदर्य शैलीच्या सौंदर्यामुळे खुलते.

शैलीचा अभ्यास म्हणजे संपुर्ण रचना–बंधाच्या रचनेचाच अभ्यास होय. काव्याच्या संदर्भात असा अभ्यास अधिक उपयुक्त ठरेल. श्री. के. क्षीरसागर म्हणतात त्याप्रमाणे, ''कोणत्याही ललित कृतीपासून सर्वच रसिक काही विशिष्ट प्रकारच्या आनंदाची अपेक्षा करीत असतात व त्या आनंदाचे मुळ कशात आहे, स्वरूप कोणते आहे व उत्कटता किती आहे हे ते ठरवित असतात''.[11]

रसिकांना आनंदाची पूर्ती करणाऱ्या साहित्यकृती त्यांच्या मनात घर करून राहतात. कवीकडून रसिकाला 'कलात्मक नवनिर्मितीची अपेक्षा असते' आणि या निर्मितीकरीता कवीने स्वतःच्या आकृतीबंधाचा त्याने प्रविणतेने अथवा वाकबगारपणाने उपयोग केलेला हवा अशी अपेक्षा समीक्षकांना सुध्दा असते. याबद्दल श्री. के. क्षीरसागर लिहीतात, ''चित्रण अथवा 'अविष्कार' घटनेचा असो, भावनेचा असो की, व्यक्तिमत्वाचा असो, त्याला अनुरूप अशा लेखनप्रकाराप्रमाणेच लेखकाने अनुरूप अशी शैली योजलेली असावी.''[12]

यावरून लक्षात येते की, अनुरूप शैली ही त्या साहित्यकृतीला विशिष्ट दर्जा प्राप्त करून देत असते. शैलीचे वेगहेपण त्या कवीचे वेगळेपण असते आणि हा वेगळेपणाच रसिकांना भावत असतो. आधुनिक मराठी कवितेते अशा हृदय हेलावणाऱ्या, स्वतःचा वेगळेपणा सिध्द करणाऱ्या, रसिकमनावर स्वतःचा ठसा उमटविणाऱ्या, उत्कटता निर्माण करणाऱ्या अनेक दर्जेदार शैलीयुक्त काव्यरचना निर्माण झालेल्या आहेत.

स्वच्छंदतावादातील कवींची शाश्वत जीवनमूल्यांवर श्रध्दा असते. यांच्या कवितांचा आशय–विषय प्रामुख्याने प्रीतीभावना व निसर्ग असला तरी त्यांच्या काव्याला तरलता, भावनिकता व स्पंदनशील रूपछटा लाभलेली असते. भावनात्मकता यांच्या कवितेचा प्राण असून भाषेला लयदारपणा लाभलेला असतो.

या प्रवाहात प्रामुख्याने ना.धो. महानोरांच्या 'रानातल्या कवितांनी' लोकगीतांच्या नैसर्गिक शैलीने मराठी वाचकांना आकर्षित केले. लोकवाङ्मयाचे संस्कार आणि लोकगीतांची स्वाभाविक लय हे त्यांच्या कवितेचे वैशिष्टय आहेत.

याविषयी नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, ''एका स्वाभाविक लयीत आणि लोकजीवनातच्या घटकांमधून निर्माण होणाऱ्या प्रतिमांमधून महानोरांच्या कवितेवर या लोकगीतांचा त्यातील प्रतिमांचा आणि लोकगीतांच्या लयीचा परिणाम आहे.''[13]

महानोरांनी लिहीलेल्या लोकगीत., गाथा, लावणी इत्यादी मधून प्राकृतिक व सोंदर्यवादी दृष्टिच भीर–भीर फिरतांना दिसते. ग्रामजीवनातील प्रणयभावना, शृंगार, तिथल्या परिसरातील ग्रामीण प्रतिमा खुल्या मनाने व्यक्त करतात. यावरून त्यांच्या मुक्त, स्वाभाविक शैलीचे दर्शन घडते. बा. भ. बोरकरांनी तर त्यांच्या हया नव्या अविष्काराचे भरभरून कौतुक केले आहे. ते लिहीतात, ''नव्या प्रतिमांशिवाय नवे काव्य संभवत नाही हा दावा तू खोटा पाडलास आहेस. जे जिवाभावाने भावले तेच गावे असा परिपाठ तू ठेवला आहेस''.[14]

पारंपारीक निसर्ग व भावकवितेपेक्षा महानोरांची कविता वेगळया वळणाने जाणारी आहे. त्यामुळे महानोरांच्या जाणिवा व शैलीला प्राकृतिक सौंदर्य लाभले आहे. हे सांगतांना अक्षयकुमार काळे लिहतात, ''भावकवितेची सीमा ओलांडून गीताकडे झूकणारी त्यांची शैली अस्सल शृंगारानुभव व्यक्त करते. मोहीनी, या वृत्तांचे कुशल संयोजन, गंधार, शिल्पाकर्षण ही तीची अकल्पीत अभिजातता या दोन वृत्तींची अशी सुसंगती घडवणारा कवी आज तरी मराठीत दुसरा नाही''.[15]

ग्रेसांसारखा संज्ञाप्रवाही व गुढवादी कवी आजपर्यंत मराठी काव्यपरंपरेत झालेला नाही. ग्रेसांच्या शैलीचे कूणी अनुकरणही करू शकत नाही. कारण त्यांनी ती वृत्ती–प्रवृत्तीतून घडविली आहे. ग्रेसांची शैली प्रासादिक नसून अलंकारिक शब्दांवर त्यांचा भर आहे. अनोख्या–अनोख्या प्रतिमांनी त्यांच्या कवितेचे गुढ कायम राहिले आहेत. सहजच ग्रेस समर्थ भावकवी व सौंदर्यकवी आहेत. त्यामूळे त्यांच्या काव्याला नाद, लय, ताल आणि सूर यांची नैसर्गिक देणगी लाभली आहे.

मराठी काव्यपरंपरेत ग्रेसांची शैली संपूर्णतः वेगळी आहे. अक्षयकुमार काळे म्हणतात त्याप्रमाणे, ''परंपरागत मराठी संस्कृतीतील नवशीलाचा साहचर्यसंगीतमुक्त उपयोग करून तिला समृध्द केले. पण त्यातच गुंतुन न पडता नेणीवप्रधान भावावस्थेतील तरल गूढ अनुभूतींना साकार करून एका अभिजात सौंदर्यशिल्पाचे रूप आपल्या कवितेला दिले. मराठी भावकवितेला आपल्या अंतस्थ गेयतेचे परिमाण देऊन समृध्द केले.''[16] ग्रेसांची ही अभिजात शैली मराठी काव्य परंपरेत कोरीव, भरीव शील्पाकृतीच आहे.. ग्रेसांच्या शैलीशी कुणाची तुलनाच होऊ शकत नाही.

मधूकर केचे नी ओवी अभंगाची शैलीचा उपयोग करून आधुनिकतेचा घाट कायम राखून स्वतःची वेगळी काव्यभाषा संपादन केलेली आहे. आध्यात्मिक भावविश्वाशी अनुरूप त्यांनी छंद निवडला

आणि भाषेचा आकर्षकपणा व डौलदारपणा यामुळे त्यांचे काव्याला उजळपणा प्राप्त झाला. स्वतःच्या भाववृत्तीत रमून जाऊन त्यांची शैली नितळ व रेखीव झाली आहे. अलौकिक भाववृत्तीचे दर्शन त्यांच्या काव्यात घडत असते. व नाविण्यपूर्ण प्रतिमासृष्टीची निर्मिती करून काव्यातील बोजडपणा नाहीसा केला आहे. अलौकिकाची जाणीव असलेली अलौकिकात गढून जाण्याची तन्मयता, रचनेचे छांदस वळण, अर्थपुर्ण व लालित्य निर्माण करणारी शब्दरचना इत्यादी वैशिष्टयामुळे मराठी काव्यपरंपरेत नव स्वच्छंदतावादीच्या वळणात मधुकर केचेंनी स्वतःचे वेगळेपण सिध्द केले आहे.

गजमल माळीच्या काव्याचे वेगळेपण म्हणजे त्यांनी मराठी कवितेला दीर्घ काळानंतर दीर्घ कविता दिली. दीर्घ कवितेची भाषा गद्यप्राय असूनही त्यांची शैली तरल आणि चिंतनीय आहे. त्यांच्या 'गंधवेणा' या संग्रहाला प्रस्तावना लिहीतांना जनार्धन वाघमारे लिहीतात, ''सामंतवादी मनोवृत्तीवर आणि वतनदारीवर अहंपणावर कठोर प्रहार करणारी, सामान्य जाणसाच्या वेदनेला जिभा देणारी आणि पीडीतांच्या जीवनाचे सांस्कृतिक सर्जन करणारी एक प्रभावी कविता म्हणून तिला मराठी वाचक ओळखतील.''[17]

वाघमारेची ही प्रतिक्रिया त्यांच्या शैलीला अनुकूल आहे. विषमतावादी समाजरचनेत वर्गसंघर्षातून हरवलेली मानवी मूल्ये त्यांनी शोधून काढली आहे. गाण्याची आवड आणि संगीताचे विलक्षण प्रेम यामुळे उ.रा. गिरीच्या काव्याची शैली तरल व नादमय झाली आहे. 50 ते 80 च्या दशकात मुक्तछंद व नवकाव्यात अनेक वळणे आलीत. गिरीची शैली आपली स्वाभाविक लय सांभाळीत तटस्थ राहीली. निसर्ग, प्रेम आणि सामान्य माणसाच्या जीवनातून आलेली अनुभूती, काव्याला फुलवत राहिली. गिरीने गीतावर व संगीतावर नितांत प्रेम केले आणि आंतरिक संगीताच्या प्रेमातून निर्माण झालेली कविता लय, ताल व नाद यांनी युक्त आहे. सौंदर्यवादी काव्य परंपरेत गिरीने गीतकाव्य व संगीतकाव्य फुलवून 'लिरीकल' शैलीची निर्मिती केली आहे

एक प्रयोगशील शैली करीता शिरीष पै ओळखल्या जातात. 'हायकू' हा जपानी काव्यप्रकार समर्थपणे हाताहून त्यांच्या शैलीची प्रायोगिकता त्यांनी सिध्द केली आहे. त्यांच्या या कार्याबद्दल अक्षयकुमार काळे लिहीतात,–जपानी हायकूचे रोपटे मराठी काव्यात रूजविण्याचे आणि त्याचे संवर्धन करण्याचे श्रेय
शिरीष पै यांचेच आहे''.[18]

नैसर्गिक सहज शैलीव्दारे निर्माण झालेल्या 'हायकू' मध्ये त्यांच्या विविध भावछटांचे दर्शन घडते.अस्सल वऱ्हाडी बोलीचा गोडचा निर्माण करणारी विठ्ठल वाघांची शैली सौइर्यवादी मराठी काव्यात विशेष लक्षणीय ठरली. वाघांच्या शैलीने वऱ्हांडी भाषेचा गोडवा आणि काव्य मातीबद्दलचे प्रेम यांना कवितेते मानाचे स्थान प्राप्त करून दिले आहे. यांच्या काव्यातील प्रतिमा विदर्भाच्या शेती, माती व वातावरणातून फुलल्या आहेत. वऱ्हाडी जाणीव, त्यातील निसर्गाचे आणि शृंगाराचे महत्व, स्थान ओळखण्याचे श्रेय विठ्ठल वाघाच्या शैलीला जाते. शेतकरी, वेदना, येथील सामाजिक व राजकीय वातावरण यातील जाणिवांचे वेगळेपण वैदर्भीय कवितेत लक्षवेधक आहेत.

सौंदर्यवादी भाव कवितेच्या परंपरेत कवी बबन सराडकराचे महत्वाचे स्थान आहे. सराडकरांच्या कवितांचा 'गेयता' हा सहज स्वभावगुण आहे. सराडकर 'जसे जगत आहे तसाच शब्दांत आहेत' अशीच साधी, स्वच्छ प्रवाही सराडकरांच्या काव्याची शैली आहे. रमेश धोंगडे यांनी या शैलीला प्रत्ययवादी शैली म्हणूनही नमूद केले आहे. लक्ष्मण माने यांचे उदाहरण देऊन ते विश्लेषण करतात, ''मराठी समीक्षेत आतापर्यंत झालेल्या शैलीचा विचार हा प्रामुख्याने प्रत्ययवादी शैली प्रकारात मोडतो.''[19] प्रत्ययवादी शैली चिकित्सेचे अगदी ताजे उदाहरण घ्यायचे झाल्यास लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' कृतीमधील भाषेविषयीचा मजकूर–

''जे जगलो, जे भोगलं, अनुभवलं, पाहिलं ते तसच लिहीत गेलो'. असे लख्मण माने ने नमूद केले. तयांच्या जगण्या–भोगण्या, अनुभवण्यात जे लय आहे. ती लिहीण्यात आलेली आहे. ती त्यांच्या जीवनाची भाषा आहे. जीवनाने धडविलेली आहे. 'संस्कारीत' नसल्यामुळे समाज वास्तवाचा, त्या ग्रामीण भागाचा चेहरा तीत स्पष्ट दिसू शकतो. भाषा सवच्छ, साधी व प्रवाही आहे''.[20]

अगदी याप्रमाणेच सराडकरांनी जे भोगलं, अनुभवलं तेच सहजतेने कवितेत मांडलं. त्यामुळे काहीशा आतमनिष्ठ स्वरूपाच्या त्यांच्या कवितेबद्दल ते स्वतः सांगून टाकतात, ''रसिकहो, माझ्या समग्र जीवनानुभवाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पण अंतर्मनाशी संकरित होऊन आत्यंतिक व्यक्तिगत स्वरूपाच्या झाल्याने आत्मनिष्ठ वाटणाऱ्या या कविता''.[21]

अशा उत्कट भावावस्थेच्या परिणतीचे प्रामाणिक अविर्भाव म्हणजे सराडकरांच्या कविता. संगीताची विशेष आवड असल्यामुळे गुणगुणणं घेऊनच त्यांची कविता अवतरत असते. हे कवीच्याच शब्दांत सांगायचे तर, ''अलीकडची कविता गेयतेची बंधन सहजासहजी स्वीकारत नसली तरी माझ्या कवितेचा मात्र गेयता हा सहजवभाव. शब्द व स्वर बेमालूमपणे एकमेकांत मिसळतात आणि हातात हात घालून ते अंतःकरणाच्या भुमीवर रूजत राहतात. परिणामी माझी कविता गुणगुणणं घेऊनचं कागदावर येते. त्यामुळे छंदमात्रांची बंधन मला कधी वाटलीच नाहीत. ज्या काळात भावगीतांचे वेड होते त्या काळात भावगीते लिहीली. गझल लिहाविशी वाटली तेव्हा–तेव्हा गझल लिहीली. अल्पाक्षरी रचना आवडू लागल्या, तेव्हा त्या प्रकाराच्या कविता हायकू मुक्तक लिहील्या. अभंग ओवीने मनाला भुरळ घातली तेव्हा अभंग ओवी लिहायला लागलो. हळू–हळू सर्व गेयप्रकारांशी कमालीचा लळा लागला.''[22]

सराडकरांनी म्हटल्याप्रमाणे त्यांनी गीत, गझल, रूबाया, हायकू, मुक्तक, अभंग, ओवी इत्यादी काव्यप्रकार सहज हाताळले आहेत. हया विविध ग्रेय व काव्य प्रकाराचे प्रयोग मराठी काव्यात सराडकरांसारखे त्यांच्या समकालीन कवीत कुणी केल्याचे आढळत नाही. या सर्व काव्यप्रकाराच्या मुळाशी सराडकरांची चिंतनशील व प्रयोगशील भाववृत्तीही दिसून येते. या चिंतनशीलतेमुळेच व विविध कावयप्रकाराची आवड असल्यामुळे यबाया, मुक्तक, हायकू व आर्ततायी अभंगाचा जन्म झालेला आहे.

अषाप्रकारे आधुनिक मराठी काव्यक्षेत्रात या भावकवींच्या षैलीचे वेगळेपण हा बाणा मराठी काव्यसृश्टीला समृध्दच करीत राहीला आहे

## निष्कर्ष

मराठी कवितेतील सौंदर्यवादी भावकवींच्या शैलीचे वेगळेपणं हे विषय संशोधन करत असताना मला आधुनिक मराठी कवितेतील शैलीतील विविधता लक्षात आलीए प्रत्येक भावकविने आपली विशिष्ट पद्धती शैली स्टाईल जपलेली आहेए आणि त्याद्वारे त्यांच्या वाट्याला आलेल्या जीवन जाणिवा, प्रेमभावना, तिथला निसर्गए प्रदेश, समाज त्यांचे भावजीवन त्यांनी ह्या शैली द्वारे काव्यातून व्यक्त केलेले आहेए हे व्यक्त करत असताना या भाव सौंदर्यवादी कवीने अनेक सुंदर निसर्ग प्रतिमांचा, त्या त्या प्रदेशातील बोलीभाषेचा सूचक वापर केलेला आहे
मला अधिक चांगल्या पद्धतीने भावलेले आहे

## संदर्भ ग्रन्थ सुचि


1. रसाळ सुधीरः 'काही मराठी जाणिवा आणि शैली', प्रतिमा प्रकाशन पुणे, पान 09
   रसाळ सुधीरः काही मराठी कवीः ताणिवा आणि शैली', प्रतिमा प्रकाशन पुणे, पाव 09
2. धोंगडे रमेश, 'मराठी भाषा आणि शैली', मधूराज पब्लिकेशन्स प्रा.ली. पुण, 1985 पृ. 190
3. धोंगडे रमेशः 'मराठी भाषा आणि शैली', मधुराज पब्लिकेशन्स प्रा.ली. पुणे सौ. अश्विनी धोंगडे, 1985 पृ. 188
4. धोंगडे रमेश, 'मराठी भाषा आणि शैली', मधुराज पब्लिकेशन्स प्रा.ली. पुणे सौ. अश्विनी धोंगडे, 1985 पृ. 191
5. धोंगडे रमेश,: 'मराठी भाषा आणि शैली', मधुराज पब्लिकेशन्स प्रा.ली. पुणे सौ. अश्विनी धोंगडे 1985 पृ. 30

6. धोंगडे रमेश, 'मराठी भाषा आणि शैली', मधुराज पब्लिकेशन्स प्रा.ली. पुणे सौ. अश्विनी धोंगडे, 1985 पृ. 30
7. ठकार निशिकांत, मराठी कविताः स्वरूप आणि विवेंचन, स्वाध्याय महाविद्यालय, प्रकाशन, पूणे – पृ. 29
8. मालशे श.ग.: 'साहित्य सिध्दांत' महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 1982.
9. 1ठकार निशिकांतः मराठी कविताः स्वरूप आणि विवेचन, पृ. 29
10. क्षीरसागर श्री. के.: 'टिकाविवेक' पॉप्युलर प्रकाशन, पुणे, पा. क्र. 474
11. क्षीरसागर श्री. के.: 'टिकाविवेक' पॉप्युलर प्रकाशन, पुणे, पा.क्र. 83
12. कोत्तापले नागनाथः मराठी कविताः 'आकलन आणि आस्वाद', स्वरूप प्रकाशन, ओरंगाबाद–2010 पृ. 167.
13. ठकार निशिकांतः मराठी कविताः स्वरूप आणि विवेचन, स्वाध्याय महाविद्यालय, प्रकाशन, पुणे.
14. काळे अक्षयकुमारः 'अर्वानीच मराठी काव्यदर्शन', वा. ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर.
15. काळे अक्षयकुमारः 'अर्वानीच मराठी काव्यदर्शन', वा. ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर.
16. वाघमारे जनार्धनः 'नागफणा आणि सूर्य' (गजमल माळी), प्रथम प्रकाशन, ओरंगाबाद–1979
17. काळे अक्षयकुमारः 'अर्वानीच मराठी काव्यदर्शन', वा. ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर.
18. 1धोंगडे रमेश,: 'मराठी भाषा आणि शैली', मधुराज पब्लिकेशन्स प्रा.ली. पुणे, सौ. अश्विनी धोंगडे 1985 पृ. 30
19. धोंगडे रमेश,: 'मराठी भाषा आणि शैली', मधुराज पब्लिकेशन्स प्रा.ली. पुणे सौ. अश्विनी धोंगडे 1985 पृ. 30
20. सराडकर बबनः 'समुद्रपक्षी', पारिजात प्रकाशन, औरंगाबाद – 1986
21. सराडकर बबनः 'समुद्रपक्षी', पारिजात प्रकाषन, औरंगाबाद – 1986